# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६९ मेणबत्ती प्रज्वलन; संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूलमध्ये भावपूर्ण श्रद्धांजली



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचालित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय, डॉ. आंबेडकर नगर सिडको आणि तुकाराम सोनवणे हायस्कूलमध्ये आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या म हापरिनिर्वाण दिनानिमित्त अत्यंत भव्य व भावपूर्ण श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शांत वातावरणात बुद्ध पूजन, बुद्ध वंदना, त्रिसरण आणि पंचशील ग्रहण करून झाली. विद्यार्थ्यांपासून शिक्षकांपर्यंत सर्वांनी मोठ्या शिस्तबद्धतेने सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय प्रकाशराव सोनवणे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना अत्यंत प्रभावी भाषण केले. त्यांनी सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ संविधान रचनाकार नव्हते, तर ते मानवी मूल्यांचे महान प्रवर्तक होते. त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण हा अन्यायाविरुद्ध लढणारा आणि समाजाला उभारी देणारा होता. त्यांनी शिक्षणाला दिलेले महत्व पाहता प्रत्येक विद्यार्थ्याने ज्ञानाच्या शस्त्राने स्वतःला सक्षम करणे आवश्यक आहे. बाबासाहेबांची विचारधारा ही केवळ इतिहासाचा भाग नसून आपल्या जीवनाचा मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत न्याय पोहोचवणे हेच त्यांच्या विचारांचे सार असून आपणही त्या दिशेने प्रामाणिकपणे वाटचाल केली पाहिजे. अशा शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या संस्थेच्या सचिव सौ. संगीता ताई खिल्लारे यांनीही बाबासाहेबांच्या




सामाजिक क्रांतीबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्यानंतर प्रमुख पाहुणे व तुकाराम सोनवणे हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. संदीप सोनवणे यांनी अत्यंत मनोगतपूर्ण विचार मांडले. त्यांनी सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजाला नवा विचार दिला. शिक्षणाद्वारे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संकल्पना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवल्या.

आपण कोणत्याही परिस्थितीत असलो, तर शिक्षण आणि परिश्रम यांच्या जोरावर प्रगती साधता येते, हे बाबासाहेबांच्या जीवनकार्याने सिद्ध केले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या आदर्शांवर चालत ज्ञानार्जनाची सवय लावून घेतली तर भविष्यात ते समाजाचे बदल घडवणारे नेतृत्व ठरू शकतात. अशा शब्दांत त्यांनी उपस्थितांना प्रेरित केले. कार्यक्रमात एकूण २२ विद्यार्थ्यांनी व्यासपीठावर येऊन बाबासाहेबांच्या कार्याबद्दल आपली मनोगते व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या संघर्षमय जीवनाची, संविधान रचनात्मक कार्याची, न्यायिक तत्त्वज्ञानाची आणि सामाजिक क्रांतीची प्रभावी मांडणी करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सहावीच्या समरीन शेख हिने अतिशय सुंदर पद्धतीने केले, तर आभार प्रदर्शन समरीन खान हिने मनापासून व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. त्यामध्ये सुनील चौधरी, हर्षल पगारे, विजय पाटील, नजमा खान, वैशाली बागुल घोडके, संजीव चौधरी आणि साहेबराव शिंदे यांचा विशेष सहभाग होता. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ६९ मेणबत्त्या प्रज्वलित करून त्यांना विनम्र अभिवादन अर्पण केले. या प्रकाशाने संपूर्ण विद्यालय परिसर शांतता, आदर व कृतज्ञतेच्या वातावरणाने उजळून निघाला. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, सांस्कृतिक आणि प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

# तरूणांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

**प्रभाग क्र. २७ च्या संपर्क कार्यालयाचे उद्धघाटन शिवसेना नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे व माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते ७ डिसें बर रोजी पार पडले. माजी नगरसेवक तथा विभागप्रमुख विनोद सोनवणे व उपविभाप्रमुख मोहन मस्के यांच्या उपस्थितीत संदेश रवी वाघमारे, रोहन सावंत, अजय भलेराव, सुरज जाधव, यश गायकवाड यांच्यासह अनेक तरूणांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसेनेत पक्षप्रवेश दि. ७ डिसेंबर रोजी झाला. शिवसेना नेहमीच तरूणांसाठी प्रेरणादायी पक्ष राहिला आहे. अनेक तरूणांना शिवसेनेने समाजात ओळख निर्माण करून दिली आहे. जनतेची सेवा करून तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचावे व फक्त एकच निशाणी मशाल....मशाल याकडे लक्ष केंद्रीत करून दिलेला उमेदवारांसाठी काम करावे, असेही विनोद सोनवणे व मोहन मस्के यांनी तरूणांना सांगितले.**

# भारत युवा संसदेत संभाजीनगरच्या निखिलने महाराष्ट्राचा झेंडा उंचावला



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

भारत युवा संसद (पंजाब) व यूथ इव्हेंट्सतर्फे पंजाब येथे नुकत्याच पार पडलेल्या भारत युवा संसद २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या वतीने राज्यदूत म्हणून निवड झालेल्या निखिल काकडे यांचा म ान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. होशियारपूरचे आमदार डॉ. इशांक कुमार यांच्या हस्ते काकडे यांना सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी होशियारपूरचे खासदार डॉ. राजकुमार चब्बेवाल तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष करण दत्त कौशल उपस्थित होते.

देशभरातून निवडलेले युवा स्पर्धक या राष्ट्रीय व्यासपीठावर सहभागी झाले होते. विविध राज्यांतील प्रतिनिधींनी शिक्षण व्यवस्था, विद्यार्थ्यांना राजकारणात येताना भेडसावणाऱ्या अडचणी, भारतातील युवकांची भूमिका तसेच भारत विश्वगुरु कसा बनेल यासारख्या मुद्द्यांवर सखोल चर्चा केली. कार्यक्रमादरम्यान निखिल काकडे यांनी महाराष्ट्रातील युवकांच्या आकांक्षा, नेतृत्वक्षमता आणि सामाजिक भान यांचा उल्लेख करत प्रभावी मांडणी केली. त्यांच्या सादरीकरणाचे मान्यवरांनी कौतुक केले. युवा पिढीसाठी दिशा देणाऱ्या भारत युवा संसदेत महाराष्ट्राचा गौरव वाढवल्याने काकडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त रविदास मंदिर हडकोमध्ये अभिवादन सभा



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

संत शिरोमणी गुरु रविदास महाराज टीव्ही सेंटर, हडको येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभेचे भव्य आयोजन बालाजी सोनटक्के यांच्या पुढाकाराने करण्यात आले. डॉ. बाबासाहेबांच्या कार्याविषयी आदर व्यक्त करण्यासाठी परिसरातील नागरिक, महिला, युवक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यानंतर सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी बाबासाहेबांच्या विचारांचा पुनःस्मरण करून संविधानिक मूल्ये, समानता, शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांच्या महत्त्वावर भाष्य केले. मार्गदर्शकांनी समाजाच्या प्रगतीसाठी बंधुत्व, एकजूट आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांची गरज अधोरेखित केली. नव्या पिढीने बाबासाहेबांच्या आदर्शांना अनुसरून समाज परिवर्तनात सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन या सभेत करण्यात आले.

कार्यक्रमात बालाजी सोनटक्के, सर सुभाष बरोदे, भिक्कन बरथरे, मदन भगुरे, दिलीप उंबरे, नर्सिंग करवरे, हिरालाल गदखने, भाऊलाल निंभोरे, ईश्वर पुसे, जीवन दुर्बे, नरवडे साहेब, राजू शेळके, चुनीलाल विटोरे, गोपाल बिरसाने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहून अभिवादन केले.

या अभिवादन सभेमुळे परिसरात सामाजिक सलोखा, जागरूकता आणि प्रेरणादायी वातावरणा ची निर्मिती झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बालाजी सोनटक्के व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199